# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.१११८५/ २१ /अ.क्र.८८१७/२५

श्री.शाम देवराम पाटील

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, (सेवा-६) ड
सार्वजनिक बांधकाम विभाग, ४ था मजला मुख्य इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव (सेवा-६) ड
सार्वजनिक बांधकाम विभाग, ४ था मजला मुख्य इमारत,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.१२.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०३.२०२१ | २०.०७.२०२१ | ३०.०७.२०२१ | २०.०८.२०२१ |

अपिलार्थी श्री.श्याम पाटील यांनी दाखल केलेल्या उपरोक्त **जोडपत्र अ, ब व द्वितीय अपिल अर्जाचे** अवलोकन केले असता असे आढळून येते की, त्यांनी तत्कालिन कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम, विशेष प्रकल्प विभाग, आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पू.) यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितली असून तत्कालिन जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.२०.०७.२०२१ रोजीच मागितलेली माहिती ही मुख्य अभियंता, सार्व.बांधकाम, प्रादेशिक विभाग, मुंबई यांचेकडून अप्राप्त असून प्रस्तुत प्रकरणाची सद्य:स्थितीतील माहिती उपलब्ध करुन देता येत नसल्याबाबत सूचित केले.

त्या विरुध्द दाखल अपिल अर्जावर तत्कालिन अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव, सार्व.बांधकाम विभाग, मंत्रालय यांनी दि.२५.०८.२०२१ रोजी पारित आदेशात जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी व मुख्य अभियंता, सार्व. बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी कागदपत्रे पाठवून पाठपुरावा करावा तसेच प्राप्त होणाऱ्या अहवालावरील कार्यवाही पूर्ण झाल्यावर त्याबाबतची माहिती अर्जदारास द्यावी असेही निर्देश दिले होते.

त्या अनुषंगाने दि.३०.०६.२०२२ रोजी मुख्य अभियंता यांचेकडून दि.०९.०२.२०२२ रोजी अहवाल प्राप्त झाल्यानंतर विभागाच्या वतीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना एक गोपनीय पत्र ज्यात श्री.पाटील यांनी केलेल्या तक्रारीतील प्रत्येक मुद्दा त्यावर प्राप्त अहवालातील निष्कर्ष हे तक्ता स्वरुपात सादर केला असून उपरोक्त पत्राची तसेच तत्कालिन मुख्य अभियंता, सार्व.बांधकाम विभाग, मुंबई यांचे दि.०९.०२.२०२२ रोजी विभागास प्राप्त अहवालाच्या प्रतीचा एक संच अपिलार्थींना विनामूल्य देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-१२-२०२५**

State Information Commission
Maharashtra